# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
## राज्यशास्त्र विभाग
## सूचना

बी. ए. भाग २ च्या राज्यशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, **सेमेस्टर ४ पेपर क्र. ५ (महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया)** च्या **अंतर्गत मूल्यमापनासाठी** **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर** होम असाईनमेंट लिहून दि. २५ एप्रिल, २०२३ पूर्वी समीक्षा फराकटे (९४०४३९५१९३) यांच्याकडे जमा करावी. होम असाईनमेंट हार्डकॉपीमध्ये प्रत्यक्ष येऊनच जमा करावी.

१) पंचगंगा प्रदूषण मुक्ती चळवळ
२) सह्याद्री बचाव चळवळ
३) नर्मदा बचाव आंदोलन
४) मुंबई मेट्रो कार शेड विरोधातील चळवळ

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

समीक्षा फराकटे

विभागप्रमुख / Head
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE
KOLHAPUR (AUTONOMOUS)

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## राज्यशास्त्र विभाग

## सूचना

बी. ए. भाग ३ च्या राज्यशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, **सेमेस्टर ६ पेपर क्र. १२ (तुलनात्मक राजकीय व्यवस्था)** च्या **अंतर्गत मूल्यमापनासाठी खालील विषयावर कोणत्याही एका प्रकल्प करून** दि. **२५ एप्रिल, २०२३ पूर्वी** समीक्षा फराकटे (९४०४३९५१९३) यांच्याकडे वर्गात तासाला जमा करावा.

**१) अमेरिकेचे संघराज्य**

**२) इंग्लंडची संसद आणि सरकार यांच्यातील संबंध**

**३) इंग्लंडमधील न्यायव्यवस्था**

**४) अमेरिकेची अध्यक्षीय व्यवस्था**

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1954

समीक्षा फराकटे

विभागप्रमुख

Head

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE
KOLHAPUR (AUTONOMOUS)

Vivekanand College, Kolhapur (Autonomous)
Department of Political Science
Project Titles for Paper No. XIV (Indian Foreign Policy DSE-1019F3)

Project Guide: S. A. Farakate
Allocation Date: 05.03.2023

| Sr. No. | Project Title |
|---|---|
| 1 | India and G20 |
| 2 | India's Position on the Ukraine War |
| 3 | World Trade Organization and India's Stand |
| 4 | India's International Trade |
| 5 | India-China Relations |
| 7 | Challenges in India's Relations with the USA |
| 8 | India's Act East Policy |
| 9 | India and ASEAN |

Samiksha Farakate

Head,
Dept. of Political Science

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR 416003

Head
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE
KOLHAPUR (AUTONOMOUS)

"Education for Knowledge, Science and Culture"

- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

## Department of Political Science

### Indian Political Thought Part – I, Sem III (BA - II 2022 - 23)

### Internal Evaluation

| Sr. No. | Roll No. | Student Name | Sing | Obtain Marks (out of 15) |
|---|---|---|---|---|
| 1 | 4401 | AAJAPGOL YASH SANJAY | | 8 |
| 2 | 4404 | BAMANE RASIKA PRAKASH | | 11 |
| 3 | 4407 | BARALE VISHAL DILIP | | 11 |
| 4 | 4411 | BUCHADE ATUL VILAS | | 11 |
| 5 | 4413 | CHAVAN RENUKA DEEPAK | | 15 |
| 6 | 4432 | GURAV YASH SURESH | | 15 |
| 7 | 4433 | HAJARE PRATIMA VINOD | | 11 |
| 8 | 4444 | JAGANADE SHIVATEJ SUKUMAR | | 11 |
| 9 | 4447 | KADAM GOURI MAHADEV | | 07 |
| 10 | 4449 | KALE HARSHADA JAGANNATH | | 15 |
| 11 | 4456 | KAMBLE KOMAL KAKASO | | 08 |
| 12 | 4460 | KAMBLE PRAMILA DILIP | | 13 |
| 13 | 4467 | KARANDE OMKAR SARJERAO | | 9 |
| 14 | 4469 | KATKAR AKASH MARUTI | | 10 |
| 15 | 4471 | KHADE SIDDHESH NIVAS | | 09 |
| 16 | 4485 | LIMKAR GAYATREE SHRIKANT | | 11 |
| 17 | 4487 | LONDHE SANDESH TANAJI | | 11 |
| 18 | 4488 | LONDHE SHIVANI RAJU | | 08 |
| 19 | 4489 | MACHHALE ABHISHEK UMAKANT | | 15 |
| 20 | 4492 | MAGDUM GANESH RAMESH | | 09 |
| 21 | 4495 | MANE ANIKET ANANDA | | 10 |
| 22 | 4499 | MANE SUKANYA PRAVIN | | 11 |
| 23 | 4503 | MOGALE ANUJ RAKESH | | |

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 24 | 4504 | MORE SAMRUDHI SANDEEP | | 15 |
| 25 | 4507 | MULLA SAFIYANAJ SALIM | | 15 |
| 26 | 4514 | NAVALE SANSKRUTI SAVAN | | 13 |
| 27 | 4517 | PANDHARPATTE POOJA RAVINDRA | | 11 |
| 28 | 4519 | PARIT AISHWARYA MURALIDHAR | | 15 |
| 29 | 4523 | PATHAN SHAHIN FIROJ | | 15 |
| 30 | 4528 | PATIL ANIKET SANDESH | | 11 |
| 31 | 4530 | PATIL HARSHA HEMANT | | 11 |
| 32 | 4534 | PATIL PRATHMESH SARJERAO | | 11 |
| 33 | 4537 | PATIL RAJNANDAN PANDURANG | | 12 |
| 34 | 4545 | PATOLE DIKSHA ASHOK | | 13 |
| 35 | 4554 | POWAR VAISHNAVI KAKASO | | 13 |
| 36 | 4573 | SHIKALGAR ASIF SAJID | | 10 |
| 37 | 4575 | SHINDE DHANASHRI JANARDAN | | 15 |
| 38 | 4578 | SHINDE VAISHNAVI SANJAY | | 09 |
| 39 | 4579 | SHIRKE PRAKASHDIP NIVAS | | 11 |
| 40 | 4580 | SUTAR VAISHNAVI RAVASAHEB | | 13 |
| 41 | 4583 | THORAT EKNATH DATTATRAY | | 09 |
| 42 | 4590 | VHARAMBALE RUTUJA RAJENDRA | | 15 |
| 43 | 4594 | BHADANGE SAGAR CHANDRAKANT | | 11 |
| 44 | 4595 | KARNURE SHUBHAM SUDHIR | | 11 |
| 45 | | | | |
| 46 | | | | |
| 47 | | | | |
| 48 | | | | |
| 49 | | | | |
| 50 | | | | |

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

"Education for Knowledge, Science and Culture"

- Shikshanmaharshi Dr.BapujiSalunkhe

## VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

### Department of Political Science

### Indian Political Thought - Sem. V (Internal Evaluation) Paper no –XI-A

| Sr. No. | Roll No. | Name of the student | Sign. of the student | Marks Obtained (Out of 10) |
|---|---|---|---|---|
| 1 | 4809 | BHILARI SARTHAK RAJAN | cultural Dept. | 09 |
| 2 | 4837 | GHERADE OMKAR DILIP | O.D. Gherade | 07 |
| 3 | 4838 | GONDHALI AVISHKAR RAVINDRA | [illegible] | 06 |
| 4 | 4847 | HULASWAR AVDHOOT PRAKASH | Hulswar | 07. |
| 5 | 4869 | KAMBLE PRAPTI SHAMUWEL | Kamble | 09 |
| 6 | 4877 | KHOT KOMAL BALASO | Komal | 10 |
| 7 | 4884. | KOLI MOHAN RATNAKAR | Sports Dept. | 09 |
| 8 | 4909 | MANE HARSHAD BABASO | Harshad | 09 |
| 9 | 4916 | MANE SIDDHI SUNIL | [illegible] | 05 |
| 10 | 4934 | PATIL KALYANI MANOHAR | Kalyani | 10 |
| 11 | 4936 | PATIL NAYAN JAYSING | [illegible] | 08 |
| 12 | 4937 | PATIL NIKHIL BHUJGONDA | NPatil. | 10 |
| 13 | 4939 | PATIL PRADNYA RAMESH | Patil | 10 |
| 14 | 4942 | PATIL SAMIKSHA ANNAKUBER | Patil | 10 |
| 15 | 4950 | PATVEGAR SHOAIB SHAHANAVAJ | [illegible] | 07 |
| 16 | 4953 | POWAR PRACHI MARUTI | PMP | 09 |
| 17 | 4957 | POWAR TEJASWEE SURESH | by whatsup. | 07 |
| 18 | 4967 | SALGAR VIKAS MARUTI | [illegible] | 10 |
| 19 | 4970 | SANADI AMISHA TUKARAM | ASanadi | 09+1=10 |
| 20 | 4983 | SWAMI APURVA GAJANAN | ASwami | 10 |
| 21 | 4989 | VADD PRASHANT PRAKASH | Prashant Vadd | 09 |
| 22 | 4992 | KAMBLE ANNAPURNA SUNIL | Sports Dept. | 10 |
| 23 | 4993 | Prashant Balaso Bhosale | Sports Dept. | 10 |
| 24 | 4995 | Girish Patil | | 07 |

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

Page No.
Date.

नाव : संस्कृती सावन नवले

कॉलेज : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त)

विषय : राज्यशास्त्र (Political science) विभाग

पुस्तकाचे नाव : स्त्रीपुरुष तुलना. लेखिकाचे नाव : ताराबाई शिंदे,

* स्त्रिया व पुरुष यांत साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध लिहित आहे.

स्त्रीपुरुष तुलना ताराबाई शिंदे यांनी रचिला. पुणे येथे 'श्री शिवाजी छापखान्यात छापिले. सन १८८२ इ.'

⊙ ताराबाई शिंदे यांची ओळख :- कै. ताराबाई शिंदे यांच्या कालखंड अंदाजे १८५० ते १९१० या कालखंडात स्त्री शिक्षणाच्या प्रसार अत्यल्प, त्यातही लिहणाऱ्या शिक्षीत स्त्रियांचा प्रमाण किती? आणि त्यांनी लिहलंय तर काय लिहणार? पौराणिक गोष्टी. ताराबाई शिंदे त्यांचे मत असे होते की स्त्री ही गृहलक्ष्मी नसुन बंदिस्त घरातील एक बटीक बनली आहे आणि याला कारण हिंदूची शास्त्रे. ताराबाई शिंदे यांचे वरून वाचन केवळ पोथ्या पुराणे किंवा समकालीन वृत्तपत्रे लावण्या पुस्तके मर्यादीन नव्हते तर तत्कालीन लोकप्रीया कथा, कादंबऱ्याही त्यांनी चिकित्साही वाचलया होत्या.

⊙ प्रस्तावना : ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न उत्पन्न केली, त्यानेच स्त्री पुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहस, दुर्गुण स्त्रियांचे अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषात आहे किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR

दाखवावे या हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचला. आहे मात अमुकच जाती किंवा कुळ आहे. याकडे माझे मुळीच लक्ष नाही. स्त्री पुरुषांची तुलना आहे.

- ताराबाई शिंदे.

* लेखिकेचा थोडक्यात परिचय : वऱ्हाड प्रांतातील बुलढाणा गावचे बापुजी हरी शिंदे यांच्या ताराबाई ह्या कन्या होत. त्यांचे वडील सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व जोतिबांचे अनुयायी होते. त्यामुळे ताराबाईंना कठोर चिकित्सा, तर्कशुद्धता न्यायप्रियता, नीती नीतीकठोरता इ. गुणांचा परिचय झाला 'शेती' कोर्ट, व्यापार यांची कामे त्या धाडसाकरून करायचे. सत्यशोधक ताराबाई शिंदे यांनी लिहिलेल्या 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध जगातले पहिले स्त्रीवादी लेखन होय. स्त्रीवादी (feminism) या शब्दाची सुरुवात होण्याआधी असे लेखन मराठीतुन प्रसिद्ध झाला. ही बाब आपण सर्वांसाठी निश्चितच अभिमानास्पद आहे.

निबंधाच्या सुरुवातीलाच ताराबाई शिंदे यांनी विधवा पुनर्विवाह या विषयावर आपली परखड मते मांडतात. स्त्री पुरुष हा जोडा ईश्वराने नेमला आहे. पक्षपासुन ते झाडझुडपात होईल त्याने स्त्रीजाती व पुरुषजाती निर्माण केली आहे. तीला पुरुषवाचुन आणि पुरुषाला स्त्रीवाचुन शोभा नाही. असे त्या नमुद करतात. त्यामुळे विधवा स्त्रीला तुरुंगात कैदी करून ठेवत असेल तर, विधवेने दुसरे लग्न केले तर काय बिघडले?

स्त्रीजातीवर दोषारोप करणाऱ्या लोकां आधीच्या खरपुसा धर्माचार स्त्रीया संशयी असतात. हे जर खरे, असेल तर त्यांचे मुख्य कारण म्हणजे स्त्रीयांचे अपठित राहणे. परंतु पुरुष संशयी नसतात हे म्हणजे कितपत खरे आहे?

आपली बायको चांगली असावी असे पुरुषांना वाटतात व स्त्रीयांना पण वाटत की आपला नवरा चांगला असावा ह्यात चुकीचे काय?

स्त्री जाती ही मुर्तिमंत मोहनी आहे ह्याच्यात तिचा काय दोष ? परंतु ती होकुन पुरुषाच्या गळ्यात पडणार नाही असे ताराबाई शिंदे सांगतात. पुरुषाच्या अंगी आलेले ज्ञान हे शिक्षणामुळे आले आहे, जर हे स्त्रीजातीला संधी मिळाली तर त्याही जाती, विद्वान म्हणून गौरविल्या जातील तेव्हा पुरुषांनी स्त्रीयांना मोकळीक द्यावी तिच्याकडे सदाचाराने वागावे अशी अपेक्षा त्या व्यक्ती करतात.

असे स्वातंत्र्य, अशी संधी स्त्रीयांनी मिळाली तर सर्वत्र, चारित्र्य, सद्भावना, आनंद निर्माण होईल असे ताराबाईना नमुद करतात.

स्त्रीयांना पुष्कळ नाहेच्ये दोष दिलेले वाचण्यात व रोजच्या वहिवाटीत टोकु येतात पण जे दोष स्त्रियांच्या अंगी आहेत तेच पुरुषात अजिबात नाही का? असे अनेक कारणे आहेत जे स्त्रीयाबद्दल समाजात दोष निर्माण करतात.

॥ ओवी ॥

स्त्री केवळ कुऱ्हाडी । सबळवृक्ष तोडी ॥
प्राणी नाडिले लक्षकोडी । मुर्तिमंत भवव्याधि कामिनी।
जाणा ॥१॥

आवर्त: संशयानामविनयभुवन पत्तनं साहसांना।
दोषाणां सान्निधानं कपटमयनरं क्षेत्रमप्रत्ययानां॥
स्वर्गद्वारस्याविघ्नं नरकपुरमुखं सर्वमायाकरंडं।
स्त्रीयंत्रं केन सृष्टं विषममृतमयं प्राणिनां मोहपाश
:॥२॥

स्त्री जर कुऱ्हाडीपेक्षा तुमचे पुण्यवृक्ष तोडिते, तर आशा या प्राणघातक कुऱ्हाडीस प्राणापेक्षा पाहुन निचे पोषणार्थ तुम्ही, आपले जन्मचे, जन्म का तोबदरीत व हरएक प्रकारचे व्यवहारिक कामात बैलासारखी राबुन घालविता ; तुमच्यापेक्षा बैल बरा त्याही त्याची स्वतःचीच काळजी मग तिकडे काही होवो।

* स्त्रीचरित्र, या नावाचे पुस्तकांत स्त्रीयांचे साहसी काही सांगो भाग्याशाली पुरुषाने वर्णिले आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR 416003 ESTD. JUNE 1964

नाव :- अपूर्वा गजानन स्वामी

महाविद्यालयाचे नाव :- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर.

विषय :- राज्यशास्त्र सेमिस्टर :- V

पेपर क्र. :- X पेपरचे नाव :- राजकीय विचारसरणी

हजेरी क्र. :- 4983 10/10 तारीख :- 18-11-2022

प्र.२. जवाहरलाल नेहरु यांचा लोकशाही समाजवाद

→ * प्रस्तावना :-

पंडित नेहरु हे मानवतावादी असल्यामुळे समाजवादाकडे ते सहज आकर्षित झाले. इ.स. १९२९ साली लाहोर काँग्रेसच्या अध्यक्षपदावरुन बोलताना नेहरूंनी समाजवादाच्या बाजूने पहिली घोषणा केली. त्यांच्या मते, आर्थिक विषमता व दारिद्र्य नष्ट करण्यासाठी समाजवादी विचारसरणी स्वीकारली पाहिजे. केवळ तात्विक व सैद्धांतिक भूमिका समाजवाद वास्तवात आणणे आवश्यक आहे. आपण समाजवादाचा स्वीकार का केला हे सांगताना नेहरु म्हणतात, "दारिद्र्य आणि त्यातून निर्माण होणारे दोष ही एक जागतिक परिस्थिती आहे. ही परिस्थिती जागतिक असल्यामुळे तिच्याविषयीची उपाययोजना जगभर जवळजवळ समानच व्हायला पाहिजे. दारिद्र्य आणि विषमता यांची पाळेमुळे भारतीय जीवनात फार खोलवर गेलेली आहेत. तेव्हा त्यांचे निर्मूलन समाजवादाच्या स्वीकाराशिवाय होणार नाही." समाजवाद हा केवळ अर्थशास्त्रीय सिद्धांत नव्हता. केवळ दारिद्र्यनिर्मूलन आणि आर्थिक दृष्टीने जीवनमान उंचावणे एवढेच ध्येय न ठेवता, ती एक जीवनाची पूर्णपणे

नवी पद्धती आहे असे समजूनच स्वीकार केला पाहिजे असे नेहरूंचे मत होते.

① <u>मिश्र</u> <u>अर्थव्यवस्था</u> :-

पंडित नेहरूंना लोकशाही समाजवादाची बैठक संमिश्र अर्थव्यवस्थेवर उभी करावयाची होती. खासगी उद्योगधंदे व राष्ट्रीय उद्योगधंदे यांना उत्पादनवाढीच्या कार्यात सहभागी करून घेऊन राष्ट्राची औद्योगिक व आर्थिक प्रगती साधणे आवश्यक आहे असे नेहरूंचे मत होते. आर्थिक नियोजन व योजनाबद्ध प्रगती या तंत्राने राष्ट्राचा विकास घडवून आणणे आवश्यक आहे, असे नेहरूंना वाटत होते. सामाजिक व आर्थिक क्रांती परिवर्तन घडवून आणण्यासाठी सार्वजनिक उद्योगधंद्यांबरोबरच खासगी उद्योगधंद्यांनाही चालना दिली पाहिजे. अर्थात खासगी उद्योगधंद्यांवर सरकारचे पूर्णपणे नियंत्रण राहील. आर्थिक शोषण, भांडवल संचय इ. गोष्टींना प्रतिबंध घालण्यासाठी शासनाचे नियंत्रण आवश्यक ठरते. तसेच केवळ उत्पादनवाढ करून चालणार नाही, तर त्याच्या वितरणाची जबाबदारीही उत्तम प्रकारे पार पडली पाहिजे.

समान आर्थिक न्यायाच्या भूमिकेतून प्रत्येकाला उत्पादनाचा योग्य वाटा मिळाला पाहिजे. संपत्तीचे न्याय्य वितरण झाले पाहिजे असे नेहरूंचे मत होते. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी भारतातील जमीनदारी नष्ट केली पाहिजे. तसेच भांडवलशाही कमी करण्यासाठी मालक-मजूर संबंध सुधारले पाहिजेत. मजुरांना आपण उत्पादन प्रक्रियेतील श्रम-साफल्याचे भागीदार म्हणून सामावून घेतले पाहिजे आहोत अशी जाणीव झाली पाहिजे. त्यादृष्टीने मजुरांना उत्पादन साधनात त्यांच्या प्रक्रियांत भागीदार म्हणून सामावून घेतले पाहिजे. अशा प्रकारे नेहरूंनी संमिश्र अर्थव्यवस्थेचा व शांततामय लोकशाही समाजवादाचा मार्ग स्वीकारला होता.

② नियोजन :-

पंडित नेहरूंच्या मते, राष्ट्राची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी सर्वप्रथम राष्ट्राची आर्थिक प्रगती होणे आवश्यक असते. त्यासाठी आर्थिक क्षेत्रात नियोजन व नियोजनाद्वारे औद्योगीकरण यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे असे नेहरूंचे मत झाले. राष्ट्रीय नियोजन समितीचे ते अध्यक्ष होते. या समितीच्या कार्यामेच भारताच्या भविष्य-काळातील समाजवादाची बैठक निर्माण झाली. भार-तासारख्या मागासलेल्या देशाला आर्थिक नियोजनाची अत्यंत आवश्यकता होती. पूर्वकाळात नेहरूंनी काँग्रेस-तर्फे नियोजन समितीद्वारे आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम हाती घेतला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० साली पहिले नियोजन मंडळ जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली स्थापन केले गेले. मागासलेल्या राष्ट्रांत औद्योगिक प्रगती घडवून आणण्यासाठी आर्थिक नियोजन अत्यंत उपयुक्त ठरते. मिश्र अर्थव्यवस्था नियोजन व लोकशाही पद्धती याद्वारे मागासलेल्या राष्ट्रांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो अशी नेहरूंची विचारधारणा होती.

* समारोप :-

१९५० पासुन जवळ जवळ १४ वर्षे नेहरूंनी आर्थिक नियोजन व मिश्र अर्थव्यवस्था याआधारे भारतात लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. रशियन पंचवार्षिक योजनां-प्रमाणेच भारतात पंचवार्षिक योजना सुरु लोकशाही मार्गाने समाजपरिवर्तनाचे कार्य नेहरूंनी सुरु केले होते. आधुनिक वैज्ञानिक शास्त्र व तंत्र यांचा वापर करुन औद्योगिक व आर्थिक प्रगती सुरु केली होती. अवजड व मोठ्या उद्योगधंद्यांबरोबर लघुउद्योग व ग्रामोद्योग यांनाही चालना देण्याचे कार्य नेहरूंनी केले होते. अशा रीतीने त्यांनी समाजवादी रचनेसाठी नियोजनबद्ध विकासावर भर देऊन मिश्र अर्थव्यवस्था प्रस्थापित केली. सर्व महत्त्वाची औद्योगिक क्षेत्रे

सरकारच्या नियंत्रणाखाली ठेवून दुय्यम स्वरूपाची क्षेत्रे त्यांनी खासगी क्षेत्राकडे सोपवली. उत्पादन-वाढीसाठी आणि आर्थिक विकासासाठी देशातील संपूर्ण साधनसामग्रीचा जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न नेहरूंनी केलेला दिसतो.

10

2022-23

Rajdhani
DATE / /

# VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR AUTONOMOUS

NAME :- AVDHOOT PRAKASH HULSWAR

ROLL NO :- 4847 SUB :- POLITICAL SCIENCE PAPER NO - 10

10/10

CLASS :- BA-TY MOB NO :- 7218342424

## जवाहरलाल नेहरू यांचा लोकशाही समाजवाद

जवाहरलाल नेहरू ह्यांच्या लोकशाही समाजवादा विषयी जाणून घेण्यापुर्वी आपण नेहरूंचे व्यक्तिमत्व, त्यांच्यावर असणारे पाश्चिमात्य विचारधारेचे प्रभाव, आणि स्वातंत्र्यपुर्वी असणारे समकालीन राजकीय व सांस्कृतिक विचारांचे प्रभाव जाणून घेणे आवश्यक आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आणि आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत होते. स्वातंत्र्यापासून ते 1964 पर्यंत सलग सोळा वर्षे ते भारताचे पंतप्रधान होते. भारतासारख्या मागासलेल्या देशात औद्योगिकीकरणाशिवाय आर्थिक विकास होणार नाही आणि औद्योगिकीकरणातून येणारी विषमता टाळायची असेल तर समाजवादाची कास धरावीच लागेल हे नेहरूंनी ओळखले होते.

परंतु समाजवादी समाजरचना प्रत्यक्षात आणण्यासाठी लोकशाही मार्गाचाच आग्रह धरला पाहिजे हे त्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व असणारी मिश्र अर्थव्यवस्था आणण्यासाठी प्रयत्न सुरु केले. मिश्र अर्थव्यवस्था व उद्योगीकरण या दोन्ही गोष्टी साधता येतील हे नेहरूंनी दाखवून दिले.

जेव्हा आपण पंडित नेहरूंचे समाजवादाविषयी विचार समजून घेत असतो, तेव्हा त्यांच्यावर असणाऱ्या इतर विचारधारेचा प्रभाव समजून घेणे आवश्यक आहे. कार्ल मार्क्स यांच्या विचारांनी नेहरू प्रभावित झाले. त्यांच्या विचारातील सर्वच विचार त्यांना पटले होते असे नाही. पण त्यातील शास्त्रिय दृष्टीकोन आणि इतिहासाचे केलेले विवेचन त्यांना महत्वाचे वाटले. जगातील विषमता नाहीशी करण्याच्या दृष्टीने एक आधुनिक आणि प्रगत तत्वज्ञान म्हणून नेहरू मार्क्सवादी विचारां-कडे पाहत होते. संपूर्ण तत्वज्ञान त्यांनी कधीच स्वीकारले नाही. तसेच रशियातील घडामोडींबाबत त्यांना कुतुहल होते. मात्र मार्क्सवादी विचाराचे संपूर्ण तत्वज्ञान त्यांनी कधीच स्विकारले नाही. तसेच रशियातील साम्यवादी शासनव्यवस्थेच्या वाटचाली बद्दल आणि लोकशाहीवर निष्ठा असल्यामुळे जे समाजपरिवर्तन घडवुन आणायचे ते लोकशाहीच्याच मार्गाने घडले पाहिजे हा नेहरूंचा विचार होता. यातूनच नेहरू हे लोकशाही समाजवादाचे समर्थक बनले. हिंसेच्या आणि क्रांतिच्या मार्गाने समाजवाद आणण्याऐवजी तो शांततेच्या आणि लोकशाहीच्या मार्गाने आणण्याचा विचार मांडणारे तत्वज्ञान म्हणजे 'लोकशाही समाजवाद' होय. नेहरु हे तत्वज्ञान मानणारे होते.

नेहरूंनी ज्या समाजवादाचा स्वीकार केला होता तो फक्त लोकशाहि मार्गाने व समाजातील सामाजिक व आर्थिक विषमता कमी करण्याच्या हेतूने प्रेरित होता. समाजवाद कशासाठी आणावयाचा हे स्पष्ट करताना नेहरूंनी हे स्पष्ट केले की, गरिबी, बेरोजगारी, मागासलेपणा हे नष्ट करण्यासाठी समाजवाद हा उपाय सांगितला आहे. परंतु ह्या सर्व बाबी दूर करताना मुळापर्यंत जावून तसेच त्या का निर्माण झाल्या ते लक्षात घेऊन ते दोष दूर केले पाहिजेत असा नेहरूंचा कटाक्ष होता. मूळ रोग आर्थिक विषमता व मालमत्तेचे सदोष वितरण हा आहे आणि त्यामुळेच समान मताधिकार किंवा कायद्यासमोर समानता या दोन्ही गोष्टी निरर्थक बनतात. खाजगी मालमत्तेचा हक्क हा या सर्वांच्या मुळाशी आहे. खाजगी मालमत्तेचा हक्कच नसेल किंवा त्याचा उपभोग मर्यादीत प्रमाणात करता आला तर आर्थिक विषमता किंवा मालमत्तेचे सदोष वितरण होणार नाही, त्यासाठी खाजगी मालमत्तेवर निर्बंध घातलेच पाहिजेत. दारिद्र्य निर्मुलन हा नेहरूंच्या मते महत्वाचा मुद्दा आहे. त्याने विषमता निर्मूलनही होईल. उत्पादन साधनांच्या मालकीवर निर्बंध घातले गेले पाहिजेत. विकासाची संधी समाजातील प्रत्येक घटकाला दिली गेली पाहिजे. दारिद्र्याचे निर्मूलन करताना केवळ श्रीमंताकडून पैसा घेवून तो गरिबांना वाटणे हे अपेक्षित नाही. संपत्तीचे न्याय वितरण अपेक्षित आहे. त्यासाठी उत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे. असे नेहरू मानतात. वर्गशोषण व वर्गसंघर्ष ह्या दोन्ही गोष्टी भांडवलशाही किंवा सरंजामशाहीत घडतात, त्यामुळे त्यांच्या भांडवलशाही व सरंजामशाहीला विरोध आहे.

भारतात जर आर्थिक व सामाजिक पुनर्रचना करावयाची असेल तर ती केवळ समाजवादातूनच करता येईल याची नेहरूंना खात्री होती. परंतु हा बदल

Rajdhani
DATE / /

करण्यासाठी हिंसा, क्रांती, सक्ती किंवा बळाचा वापर यावर त्यांचा विश्वास नव्हता. सर्व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी त्यांच्याकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे याची जाणिव नेहरूंना समाजवादाने करून दिली. केवळ परिणामांशी झुंजण्याऐवजी त्या परिणामांची कारणे शोधणे आवश्यक आहे. परिणामांची कारणे शोधून त्याचे उच्चाटन केले तर आपोआपच परिणामांचेही निर्मूलन होईल. ही खात्री नेहरूंना असल्यामुळे त्यांनी समाजवादी विचारसरणी भारतात उपयुक्त असल्याचे ठामपणे सांगितले.

समाजवाद मुळत: सत्यात उतरवणे हे केवळ लोकशाही मार्गाने शक्य असल्यामुळे नेहरु नेहमी समाजवादी लोकशाहीचा पुरस्कार करत होते. समाजवाद स्वीकारणे आवश्यक होते याची खात्री नेहरूंना वाटत होती. त्यासाठी मार्क्सवादी विचारसरणीचा स्वीकार करणे शक्य नाही असे विचार नेहरूंनी मांडले. मार्क्सच्या विचारातील शास्त्रीय दृष्टिकोनाचे महत्त्व त्यांना वाटत होते. नेहरूंना मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत मान्य होता. परंतु मार्क्सच्या विचारातील काही गोष्टी त्यांना मान्य नव्हत्या. उदाहरणार्थ, मार्क्सने मांडलेली कामगारांची हुकूमशाही ही कल्पना नेहरूंना मान्य नव्हती. त्यांचा लोकशाहीवर ठाम विश्वास होता. मताधिकार, मूलभूत हक्क इत्यादी गोष्टींचे त्यांना खूप महत्व वाटत होते. हुकूमशाही कोणत्याही स्वरुपात असली तरी त्यांना मान्य नव्हती. ती पक्षाची असो वा कामगारांची असो हुकूमशाही ही अखेरीस हुकूमशाहीच असते असे नेहरूंचे मत होते. एकपक्षीय लोकशाहीदेखील नेहरूंचा विरोध होता. पक्ष नसतील तर तेथे कदापिही लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही. विरोधी पक्ष असतील तरच ती खऱ्या

अर्थाने लोकशाही असते. विरोधी पक्ष हे समर्थ व दक्ष असलेच पाहिजेत असा नेहरूंचा विश्वास होता. भांडवलशाही एके काळी उपयुक्त ठरत होती. हे खरे, परंतु भांडवलशाहीतून निर्माण झालेल्या प्रश्नांनी जनता गांजली आहे. भांडवलशाहीमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली आहे. परंतु वितरणाबाबत अनेक समस्या त्यातून निर्माण झाल्या आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी समाजवाद हा मार्ग आहे असा नेहरूंचा विश्वास होता.

नेहरूंच्या मते, भांडवलशाहीत लोकांनी, लोकांसाठी व लोकांचे चालविलेले लोकशाही शासन कधी अस्तित्वात येणार नाही. कारण भांडवलशाहीत कायदासमोरील समता किंवा सामाजिक समता टिकून राहत नाहीत. सर्वांना समान मताधिकार असला तरी तो कागदोपत्रीच राहतो. लोकांनी लोकांचे लोकांकडून चालविलेले शासन केवळ समाजवादातच असते, कारण तेथे लोक खऱ्या अर्थाने राष्ट्रीय मालमत्तेत व सरकारमध्ये सहभागी होत असतात. नियोजनावर नेहरूंचा ठाम विश्वास होता. समाजवाद साधण्यासाठी आर्थिक नियोजन कसे केले पाहिजे अशी त्यांची खात्री होती. १९३८ साली स्थापन झालेल्या 'नॅशनल प्लॅनिंग कमिशन'चे ते अध्यक्ष होते. भारतातील सर्व प्रमुख प्रश्नांवर तेथे चर्चा झाली. दारिद्र्य, बेकारी, मागासलेपणा यावर उपाय म्हणून समाजवाद उपयुक्त आहे, असे नेहरूंनी येथे मांडले, या समितीनेच लोकशाही समाजवादाची कल्पना भारतात प्रथम मांडली. सामान्य माणसाचा प्रामुख्याने विचार झाला पाहिजे. सामान्य माणसाचे हित पाहणे, त्याला विकासाची संधी देणे, विकासातील अडथळे दूर करणे, ही नियोजनाची मुख्य उद्दिष्टे व सामान्य माणूस हा नियोजनाचा केंद्रबिंदू मानला गेला.

भारतात लोकशाहीच्या मार्गाने आर्थिक आणि सामाजिक समता निर्माण करण्यासाठी लोकशाही समाजवाद उपयुक्त ठरु शकतो, असे नेहरुंचे मत बनले. लोकशाही समाजवादाची मूलतत्वे याप्रमाणे आहेत.

1) व्यक्तिहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य.
2) स्पर्धे ऐवजी सहकार्याला प्राधान्य
3) संपत्तीचे केंद्रीकरण टाळून देशाच्या साधनसंपत्तीचा उपयोग सर्व जनतेच्या हितासाठी.
4) मूलभूत आणि महत्त्वाचे उद्योग सार्वजनिक मालकीचे.
5) मूलभूत हक्क आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांना संरक्षण. पण त्याचबरोबर समाजहितासाठी मुलभूत हक्कांवर आणि व्यक्ती स्वातंत्र्यावर वाजवी बंधने घालण्याचा अधिकार राज्याला असला पाहिजे.
6) प्रत्येक व्यक्तीस मूलभूत गरजा भागतील आणि प्रत्येकाला विकासाची संधी मिळेल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा कल्याणकारी राज्याची प्रस्थापना.
7) घटनात्मक आणि शांततामय मार्गावर विश्वास.

लोकशाही समाजवादाच्या या तत्वांचा पाठपुरावा नेहरुंनी आपल्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीत केला. नेहरुंच्या दृष्टीने समाजवादाचा मार्ग म्हणजे समाजातील शोषणाविरुद्ध लढाई होतीच, पण त्याचबरोबर देशाचा वेगाने विकास करण्याचा तो मार्ग होता. भारतासारख्या विकसनशील देशाला अल्पकाळात विकासाचा मोठा पल्ला गाठायचा असेल, तर शासनाने त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आर्थिक, औद्योगिक विकासाची जबाबदारी केवळ खाजगी उद्योजकांवर टाकून चालणार नाही, ही जाणीव नेहरुंना होती.

10